Vol-13 Special Issue- 1.3 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# "वसुधैव कुटुंबकम" या संकल्पनेला अनुरूप समृद्धी महामार्ग निर्मिती दरम्यान वाशिम जिल्ह्यात जलसंधारणाची कामे

**प्रा.डॉ. दिलीप नि. लांजेवर**
मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम
**बयस किशोर चंद्रपालसिंह**
मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम

**सारांश (Abstract )**

एक क्रांतिकारी शासन निर्णय येतो अत्यंत महत्त्वाचं काम त्यानिमित्ताने पूर्णत्वास जाते हा एक योगायोगच म्हणावा लागेल. एकाच वेळी महामार्गाचे काम व त्याकरिता लागणाऱ्या गौण खनिजाच्या उपलब्धतेसाठी खोदकाम .त्यातून झालेले जलसंधारणाचे काम यामुळे महामार्गालगतचा भाग पाणीदार झाला आहे. राज्याच्या मृदा आणि जलसंधारण विभागाने काढलेल्या एका शासन अध्यादेशामुळे. या शासन आदेशामुळे बांधकाम सुरू असलेल्या महामार्गांना लागणाऱ्या माती दगड व इतर गौण खनिजा करिता जलसंधारण उपचारांच्या कामाची सांगड घातली गेली. त्यामुळे वाशिम जिल्ह्यात हिरवाईचे, आबादानीचे शेतकऱ्यांचे स्वप्न पूर्णत्वास गेले आहे. या स्वप्नाला मूर्तरूप देण्यासाठी कारणीभूत ठरला आहे.

**Keyword –** जलसंधारणाचे महत्त्व

**प्रस्तावना (Introduction ) :** वाशिम जिल्हा जलसिंचनाचा अनुशेष असलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. मोठ्या नद्या ,मोठे धरण जिल्ह्यात नाही. भौगोलिक रचना व तापी ,गोदावरी नदी च्या जल विभाजकाचा भाग असल्यामुळे पाण्याचा साठा जिल्ह्यात कमीच आहे.म्हणून लहान मोठे पाझर तलाव पाटबंधारे शेततळे यावरच सिंचनाची भिस्त आहे. जल साठे वाढवण्याची गरज आहे. याकरिता शासन नेहमी प्रयत्नरत असते. समृद्धी महामार्ग व इतर राष्ट्रीय महामार्गासाठी लागणारा मुरूम व गौण खनिज खोदकाम आणि जलसंधारणाच्या कामाची सांगड घालण्याचा शासन निर्णय आल्यानंतर वाशिम जिल्हा प्रशासनाने याचा फायदा घेण्याचे ठरविले. जिल्ह्यातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गासाठी लागणाऱ्या मुरमाकरिता शेततळे, खोदकामास परवानगी देण्यात आली. त्यासाठी मोठी शेततळी खोदण्याचे काम मोठ्या प्रमाणात झाले. यासाठी लहान-मोठी 80 काम करण्यात आली.

## उद्देश (Object )

शेतीच्या उत्पादन वाढीसाठी सिंचन प्रकल्पाची गरज आहे .

पाणी टंचाई वर मत करण्यासाठी जलपुनर्भरनाची गरज.

जलसंधारणासाठी उपाययोजना राबविणे

## गृहीतक (Hypothesis )

जल विषयक धोरणाच्या अंमलबाजवणीतून जलसाठा वाढण्यास मदत होते .

जलसंधारण अत्यंत महत्वाचे आहे

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

जल सिंचनाची समस्या वाढत आहे.

वाशिम जिल्हा सिंचन अनुशेष असलेला जिल्हा आहे.

**संशोधन पद्धती :** अभ्यासासाठी निरीक्षण पद्धती. प्राथमिक माहिती, द्वितीयक माहिती सामग्रीचा आधार घेतला आहे. तुलनात्मक पद्धती,संख्यात्मक पद्धती, कृषि विषय, महाराष्ट्र शासन अहवाल यांचा प्रामुख्याने आधार घेतला आहे.

**संशोधन माहिती विश्लेषण (Reasearch Data analysis) :** प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे केले आहे,

समृद्धी महामार्ग निर्मिती दरम्यान जलसंधारणाची कामे .

मोठे शेततळे

नाल्यांचे रुंदीकरण

नद्यांची खोलीकरण व रुंदीकरण

पाझर तलावांचे गाळ काढणे. व खोलीकरण

ही सर्व महत्त्वाची खोतकामे केली. त्यापासून समृद्धी महामार्गाच्या बांधकामासाठी मुरूम, दगड,गिट्टी, व इतर गौण खनिजांची उपलब्धता झाली. त्याचबरोबर समृद्धी लगतच्या परिसराला मोठा फायदाही झाला. जलसंधारणाची कामे यामुळे आपसूकच घडून आली .

परिसराला जलसंधारणाचा फायदा :- परिसराला जलसंधारणाच्या बाबतीत मोठा फायदा झाला.

जलसंच यनाची क्षमता वाढली.

विहिरींची पाणीपातळी वाढली.

शेतकऱ्यांना अधिकची पिके घेता येऊ लागली.

पीक पद्धतीत बदल घडून आले.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली.

वाशिम जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती

- वाशिम अवर्षण प्रवण जिल्हा आहे. जिल्ह्याचा पृष्ठभाग बेसॉल्ट खडकाचा बनलेला आहे. भूभागाचा विचार केला तर उलट्या बशीप्रमाणे या जिल्ह्याची भौगोलिक रचना आहे. पाणी मुरण्याची क्षमता अत्यंत कमी आहे.
- जिल्ह्यातून अनेक छोट्या नद्या उगम पावतात. परंतु जिल्ह्याच्या सीमेवरून वाहणारी पैनगंगा नदी सोडली तर कोणतीही मोठी नदी जिल्ह्यातून वाहत नाही. त्यामुळे पाणी मुरण्याची क्षमता कमी आहे.
- जिल्ह्यात मोठे सिंचन प्रकल्प नाहीत.
- पृष्ठभागावर साचलेल्या पाण्यावरच शेतकऱ्यांची भिस्त आहे.

वाशिम जिल्ह्यात राबवलेल्या योजना.

जलयुक्त शिवार अभियान

मागील त्याला शेततळे.

गाळ मुक्त धरण

युक्त शिवार

या योजनांमधून विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करण्यात आले व सिंचन सुविधा वाढविण्याचे काम जिल्ह्यात झाले.

समृद्धी महामार्गाचा वाशिम जिल्ह्यातून 97.23 किलोमीटरचा टप्पा जिल्ह्यातील कारंजा, मंगरूळपीर, मालेगाव रिसोड या तालुक्यामधून जातो समृद्धी महामार्गाच्या कामाची सांगड जलसंधारणाच्या कामाशी घालण्यात आली व त्या निमित्ताने मोठ्या

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

आकाराची शेततळी,, नाला खोलीकरण, पाझर तलावातील गाळ उपसा, अशी ऐंशी काम पूर्ण झाली. यामधून 3588.22 लक्ष घनमीटर उत्खनन झाले. यासाठी कोणताही शासनाचा इतर खर्च झाला नाही. जर यासाठी शासनाने स्वतंत्र खर्च केला असता तर तो अंदाजे 17 कोटी 94 लक्ष रुपये एवढा झाला असता. या निर्णयामुळे जिल्ह्यात 50 x 50 x 3 मिटर ते 100 x 100 x 3 मीटर आकाराची एकूण 47 शेततळे समृद्धी महामार्गाचे सांगड घालून खोदण्यात आली. यामध्ये 783.2 टीएमसी पाणीसाठा निर्माण झाला आहे. याचा परिणाम आजूबाजूच्या विहिरींना पाणी वाढले परिसराची पाणी पातळी वाढली या सर्व गोष्टीचा फायदा आज शेतकऱ्यांना होतो आहे.

| खोदकाम प्रकार | आकार( मीटर ) | संख्या |
|---|---|---|
| मोठे शेततळे | 100 x100 | 20 |
| लहान शेततळे | 50 x50 | 27 |
| नाला रुंदीकरण | 9 | |
| पाझर तलाव गाळ उपसा | 200 x 200 | 8 |
| नदी खोलीकरण | 10 x 500 | 5 |

संदर्भ – करंजा तालुक्यातील भडशिवनी गावचे माजी सरपंच सरोदे म्हणतात की ' समृद्धी महामार्गाच्या कामासाठी खोदलेल्या शेततळ्यामुळे गावाला पाण्याची दिशा दाखवली. व गावची पाणी पातळी वाढली आहे क्लासमध्ये गावाच्या वरच्या दिशेला शंभर शंभर बाय तीन मीटर चे मोठे शेततळे घेतल्यामुळे गावाजवळ विहिरींना पाणी पातळी वाढली आहे

उन्हाळ्यातील पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न सुटला आहे.

जनावरांना प्यायला बाराही महिने पाणी उपलब्ध झाले आहे. अशी प्रतिक्रिया परिसरातील अनेक नागरिकांनी दिली आहे. शेततळे निर्मिती नाले रुंदीकरण तलावातील गाळ उपसा नदी खोलीकरण व रुंदीकरण यामुळे मृदा व जलसंधारणाची कामे अफसुकच झाली आहेत कुठलाही खर्च न लागता व कोणतीही अन्यत्र जमीन वाया न घालवता ई क्लास जमीन, नाला, तलाव, नदी अशा जमिनीवर हे काम झाले आहे. अन्यत्र झाले असते तर ती जमीन कोणत्याच उपयोगाची राहिली नसती.सारांश या जलसंधारणाच्या कामामुळे जिल्ह्यातील कारंजा, मालेगाव, रिसोड या तीन तालुक्यात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा निर्माण झाला आहे., त्यामुळे खरीप आणि रब्बी हंगामातील पिकांना संरक्षित सिंचनाची सुविधा निर्माण झाली. व परिसरातील शेतकऱ्यांना भाजीपाला व फळबाग पिकासाठी याचा उपयोग झाला आहे.समृद्धी महामार्ग व त्या अनुषंगाने उभारलेला हा जलसंधारणाचा पॅटर्न भविष्यात अत्यंत उपयोगी ठरणारा आहे.

## संदर्भ

जलसंधारण विभाग जिल्हा वाशिम

मासिक जलसंवाद

वासिम जिल्हयातील शेतकऱ्यांची मुलाखत

http://youtu.be/z0LEMUakC7 l?feature=shared